07032014

| RGJAYS | Sign |
| --- | --- |
| Inward No.:- 930 | |
| C.E.O. | |
| Dy. C.E.O. | |
| F.A. | |
| A.D.H.S. | |
| G.M. (HR/Admn/S.V.O. | |
| | |

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना छपाई करुन वितरीत करावयाच्या आरोग्य ओळखपत्राच्या दर निश्चितीबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग,
क्रमांक रागांयो-२०१३/प्र.क्र.५०१/आरोग्य-६,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक ४ मार्च, २०१४.

Health Cards. Patch

**वाचा:-** १) शासन निर्णय क्रमांक रागांयो-२०१३/५०१/आरोग्य-६, दिनांक १७.१२.२०१३.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी,राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटी,मुंबई यांचे पत्र क्र. रागांजीआयो/आप दर निश्चिती/८७२/५१४/२०१४, दिनांक १.३.२०१४ चे पत्र.

Dr Panade Pl. Sel.

**शासन निर्णय:-** राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत समाविष्ट पात्र लाभार्थी कुटुंबांना सदर योजनेंतर्गत दिल्या गेलेल्या आरोग्य ओळखपत्राद्वारे सदर योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या रुग्णालयांकडून नि:शुल्क उपचार अनुज्ञेय आहेत. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची राज्यातील उर्वरित २७ जिल्हयांमध्ये दिनांक २१.११.२०१३ पासून अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली असून आरोग्य ओळखपत्र छपाई करुन वितरीत करण्याची कार्यवाही अंमलात आणलेली आहे. शासन स्तरावरुन यापूर्वी दिनांक १०.१०.२०१३ च्या पत्रान्वये महा ई-सेवा केंद्र व संग्राम केंद्राकडून छपाई करुन वितरीत करण्यात आलेल्या प्रति आरोग्य ओळखपत्र रु. ६.०० इतका दर निश्चित करण्यात आलेला होता. आरोग्य ओळखपत्र छपाई करुन वितरीत करण्याबाबत राज्यातील टपाल कार्यालयांनाही या योजनेत समाविष्ट करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेऊन त्या संदर्भाने टपाल कार्यालयाशी सामंजस्य करार सोसायटीकडून करण्यात आलेला आहे. सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थी कुटुंबांना राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना ओळखपत्र अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या ई-पीडीएफ डाटा वा त्यांनी पुरविलेल्या सॉफ्ट डाटाच्या आधारे महा ई-सेवा केंद्र, संग्राम केंद्र व राज्यातील टपाल कार्यालय (पोस्ट ऑफिस) मार्फत छपाई करुन वितरीत करण्याबाबत संदर्भ क्र.१ अन्वये शासनाने निर्णय घेतलेला आहे. या अनुषंगाने महा ई-सेवा केंद्र, संग्राम केंद्र व टपाल कार्यालयास छपाई करुन वितरीत करावयाच्या आरोग्य ओळखपत्रासाठी आर्थिक मोबदला देणे आवश्यक आहे.

या संदर्भाने असे आदेश देण्यात येत आहेत की, आरोग्य ओळखपत्र छपाई करुन वितरीत करण्यासाठी संबंधित संस्थांना द्यावयाच्या आर्थिक मोबदला देण्याच्या दरामध्ये सुसूत्रता असण्याच्या दृष्टीकोनातून राज्यातील महा ई-सेवा केंद्र, संग्राम केंद्र तसेच टपाल कार्यालयाकडून छपाई करुन वितरीत करावयाच्या आरोग्य ओळखपत्रासाठी प्रति आरोग्य ओळखपत्र रु.६.५० (अधिक सेवा कर) असा दर निश्चित करण्यात येत आहे. सदरचा दर स्टेशनरी सोडून असून स्टेशनरीचा खर्च हा राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटीने करावयाचा आहे.

२.	राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत आरोग्य ओळखपत्राची योग्य प्रकारे छपाई होऊन आरोग्य ओळखपत्रे योग्य प्रकारे वितरीत करण्यात येत असल्याबाबत राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटीने पडताळणी तपासणी करुन त्यानंतरच संबंधित संस्थांना त्या प्रयोजनार्थ देण्यात येणारा मोबदला अदा करण्याची कार्यवाही राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटीने करणे आवश्यक आहे. सदर प्रयोजनार्थ येणारा खर्च राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटीस उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीतून करावयाचा आहे.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्यांचा सांकेतांक क्रमांक असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ता. मा. कोळेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री (सार्व.आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री (सार्व.आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव-२, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई.
मुख्य कार्यकारी विभाग, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटी, मुंबई.
संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
मुख्य पोस्ट मास्टर जनरल, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाऑन लाईन, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती/आरोग्य-६.